

# क्रांति-पराग



नेताजींच्या पवित्र स्मृतीस
सादर समर्पण

किंमत २ आणे

—प्रभु गुंफराज

गुंफराज प्रकाशन : भाई जीवनजी लेन, मुंबई नं. २

# निरोप .... ....

भारतीय स्वातंत्र्याचे निस्सीम पुजारी आणि थोर क्रांतिकारक नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या जयंति निमित्त त्यांच्या पूजनासाठीं माझ्या कांहीं कवितांचा उपयोग व्हावा हा योगायोग म्हटला पाहिजे. तांबोसें ग्रामसेवा संघ, मुंबई या संस्थेचे अध्यक्ष श्री. रा. शि. सामंत, या कविता प्रसिद्ध करीत असून, याच संस्थेचे कार्यकर्ते काव्यगायक श्री. जी. सामंत यांनीं या कवितांचे गायनविषयक हक्क स्वतःसाठीं घेतले आहेत. या प्रकाशनाचें सर्व उत्पन्न एका सार्वजनिक संस्थेला मिळावें हा योगायोगाचा दुसरा भाग झाला. महाराष्ट्रांत आज अनेक प्रतिभासंपन्न कवि आपल्या दिव्य प्रतिभेनें तळपत असतांना अगदींच सामान्य अशा ह्या कविता '**क्रांति-पराग**' या नांवानें पुढें पाऊल टाकीत आहेत. श्रद्धा, सहानुभूति आणि तळमळ यांच्या भांडवलावर रसिकांच्या अंतःकरणांत त्यांना मानाचें स्थान मिळणार असेल तर माझा अडथळा कशाला ?

मुंबई
१८-१-४९

**—प्रभु गुंफराज**


## गुंफराज प्रकाशन

सहाय्यक

जनरल : **जगन्नाथराव भोंसले**

**वि. कृ. नेरूरकर** B. A., S. T. C.

श्री. **राधाबाई तुकाराम देसाई**

**रडतोंडीचा घाट**

**किं. ३ आणे**

ही बहारदार गोष्ट पुढील महिन्यांत प्रसिद्ध होत आहे.

लेखक—**सदानंद रेगे**

# पुत्रधर्म .........

खरा पुत्र तोच कीं ज्याला पुत्रधर्माची जाणीव तीव्रतेनें होते. १९४२ च्या आंदोलनांत भारतीय पुत्रांनी जो आत्मयज्ञ केला त्याला इतिहासांत तोड नाहीं.

★

मी पुत्र तुझा तूं माझि आई
कां सांग माते, मग खिन्नता ही ?
सामर्थ्य संपन्न मी ज्ञानसंपन्न
उपयोग ना का इतुकेंहि मिळवून
जगिं पाहिल्या मी कितिशा सुमाता
दिव्यत्व येथें परि ये दिसून !
तुझी त्याग मूर्ती तुझी दिव्य कीर्ति
असुनी मला ज्ञात राहूं क्रियाशुन्य ?
पतिहीण कांता, छळावी कुणी का
मी पुत्र असतां धजावा असा कोण ?
हृदीं आग तूझ्या अन् अश्रु नेत्रीं
दिसुनी मला कां मी राहुं झोंपून ?
तो वैनतेय ऽ खेळोनि झुंजी
करि मुक्त माता मधुकुंभ आणून
ही शक्ति, हें वित्त, हें ज्ञान, हे प्राण,
तव मुक्तिप्रित्यर्थ खर्चीन ही आण !
तुज मातृहृदया मिळो एक शांति
ही आस माझी, अन् पुत्र-धर्म

# आहुति — — -

क्रांतीची ज्योत तेवत ठेवण्यासाठींच त्यांची आहुति !—

आहुती मला द्यायाची
या माझ्या प्रिय प्राणांची
रक्ताचें या होइल तेल
ज्योत निरंतर मग तेवेल
दीप्ति हिची व्यापुनि विश्वाला—
अखंड येथ उरेल !

स्वराज्य मजला, तसें तुम्हाला
स्वत्व हवें मज, नको कुणाला ?
सिद्ध व्हावया हवें बंधुनों
जागविण्या ही ज्योत !

यांतच सर्वां दिसेल वाट
गर्दी होइल लागोपाठ
साध्य आमुचें अखेर आम्ही—
मिळवूं कांठोकांठ !

मजमुळें ज्योत ही उजळो
द्वेषभाव सारा वितळो
विफल न होवो हें बलिदान
जयभारत जय बोलो !

# बंदी ?

ती एक महान् व्यक्ति होती. जगांतील कोंपरान् कोंपरा त्याच्या तेजानं उजळून गेला होता. जग त्याच्याकडे आदरानं पाहत होतं आणि राजसत्ता त्याला बंदी समजत होती !!

जग पुन्हा पुन्हा वंदी
कोण म्हणे त्या पुरुषा बंदी ?
सत्यास्तव जो अविरत लढला
ना अवलंबी जो हिंसेला—
सत्याग्रहि तो वीर, तयाला—
कोण करिल बंदी ?
जग पुन्हा पुन्हा वंदी !
हास्य जयाचें महन्मंगल,
दुःखांनीं करपले शांतबल,
मेघ दयेचा पाऊस पाडिल
दवडिल कोण ही संधी !
जग पुन्हा पुन्हा वंदी !
नभोमंडळीं सूर्य प्रकाशे
स्वयंपूर्ण जो तमा विनाशे,
कोण भास्करा घालुन फांसे—
करूं ऽ धजे बंदी !
जग पुन्हा पुन्हा वंदी !
विश्व जयाच्या कृतीस मान्य
शब्द जयाचा हो न अमान्य
त्या पुरुषा लेखुनि सामान्य
कोण म्हणे रे बंदी ?
जग पुन्हा पुन्हा वंदी !!

# निखारे ............

आज ज्यांना आपण थोर मानतों...ज्यांचें अनुकरण करण्यांत अभिमान बाळगतों, त्यांनासुद्धां विरोधाचे हे धगधगीत निखारे तुडवावे लागले आहेत.

हे धगधगते लाल निखारे
मार्गी कुणितरी तुझ्या पसरले
नवा प्रवासी. अढळ निश्चयी
अडेल कां कधिं सांग?
निंदेचे शर कुणि न ोशिले,
इतर प्रवासी न का कष्टले,
नव्या क्रांतिचा भावि पुढारी
खचेल का मग सांग?
वज्रदेही तूं मार्ग आक्रमी
विश्व दिपेलहि तुला पाहुनी
दिपगृहांतिल तेज विलोकुनि
नावाडी बेभान!
ते धगधगते लाल निखारे
आग संपली राखही नुरे,
विमल यशाचा ओघ वाहतां
स्मृतिविण मागें काय?

# थडगीं उकरणारांस—

क्षणिक अधिकाराच्या जोरावर, सिंगापूरमधील आझाद हिंद सेनेचें भव्य स्मारक कांहीं हिंदी सैनिकांनीं उध्वस्त केलें त्यांना—

मेलेल्यांचीं थडीं उकरुनी
मढीं काढितां कशास त्यांतुनी
जिवंतपणिं जें तुम्हा न जमलें
तेंच कराया काय ?

स्विकृत कार्यीं बुद्धि रंगली
विश्रांती ज्यां कधिं न मिळाली
चिरविश्रांति, घेण्या निजती
तें न पाहवे काय ?

ज्यांच्या पुढतीं ' जी जी ' करितां
ज्यांच्या पुढतीं नाक घांसतां
तेही ह्यांना थरथरतांना—
कधीं न दिसले काय ?

वाणी ज्यांची जगा मोहवी
कृती जयांची जगा तारवी
मरणें ज्यांच्या विश्व हळाळे
तें न पाहिलें काय ?

भाविक अमुच्या हृदयांमधुनी
स्मारक त्यांचें ध्यारे पाहुनी
छाति कुणाची पाडायाची—
तुम्हास आहे काय ?

## सैनिकास .... .... ....

ही संधि न येई पुन्हा पुन्हा
रे चाल सैनिका अजुनि रणा ॥ ध्रु० ॥
देशहिताचें बांधुनि कंकण
तूंच करावें काय पलायन
'देशद्रोहि' हा, हें अभिदान
रुचेल कारे तुझ्या मना ?
पिसाट वारा बघुनि अपेशी
काय सुकाणू सोडि खलाशी
जीवित जातां रसातळाशीं
कोण पुसे त्या भित्या मना ?
तुझ्या प्रीतिनें तुला बांधुनी
अपमानी तुज कोण याक्षिणी
काय हेरिशी क्षितिजामधुनी,
कां पाश न तुटती तुज तरुणा ?
तुटावयाचे जीवित धागे
काय तोडण्या पाहसि मागें
रणांगणीं बघ कुंड धगधगे
ही संधि न येई पुन्हा पुन्हा
तूं चाल सैनिका अजुनि रणा ! !

# निघालों निघालों निघालों रणा—

नेताजींचे शूर सैनिक इंफालच्या आघाडीवर मातृभूमीच्या मुक्ततेसाठीं लढत होते. सिंगापुरापासून इंफालपर्यंत हजारों मैलांचा प्रदेश पायीं तुडविणारे आझाद हिंद सैनिक धन्य होत !

निघालों निघालों निघालों रणा
अगे मातृभूमे तुझ्या रक्षणा ॥ धृ० ॥

तुवां पोशिलें गे मला अन् आम्हाला
तुवां पोशिलें गे जगा पूर्वजांला
तुझें दानशूरत्व ना तूलनीय
जगीं एक तूंची मला वंदनीय ! ॥ १ ॥

मनीं मानसीं चिंतुनियां स्वराज्य
जगीं कष्टले आणि मेले अशांना
म्हणोनी तयांनाच गाजी शिवाजी,
मी हा वंदितों अन् कृपा वांछितों जी ! ॥ २ ॥

जरी घ्यावयाचा पुन्हा जन्म झाला
तरी घेऊं निःशंक ह्या भारतीं
तुझे पुत्र आम्ही तुझे पांग फेडूं
कवि ‘ माधवा ’ सारखे गर्जती !! ॥ ३ ॥

# 'मेला हाय !' कशानें ?

महेंद्र चौधरी, राजनारायण मिश्र आणि असे कित्येकजणदरोडेखोर म्हणून फांसावर लटकले. त्यांपैकीं फारच थोड्यांची माहिती देशाला असेल.

फांसावर जाण्यापूर्वी पुढीलप्रमाणें विचार, त्यांच्या मनांतआले असतील का ?

लटकेन जराशानें; फांसावर—
लटकेन जराशानें !
आणि न कधिंहि कळेल कोणा
मेला 'हाय !' कशानें
जीं जीं केलीं साहसकर्में—
ज्या ध्येयासाठीं;
ध्येय निमालें, मीहि संपलों
शेवट आटाआटी
स्वातंत्र्यास्तव जे जे लढले—
पुजे तयांना देश.
अन् नाशिबीं का माझ्या यावा
अखेर हा फांस ?
कुटील नीति, असे जगाची;—
'तोंडावर हांसूं !'
हांसत जातिल मानवतेच्या
तोंडा काळें फासूं.
मरणाचें भय कधीं न शिवलें,—
जन्मामाधिं जीवा.
चोरासम हा मृत्यु येतसे,
चोरुनि घाली घावा
माझ्याघरीं का मीच लुटारू;—
न्याय करिति हे चोर.
अन्यायाचा अन् वरवंटा
फिरेल मानेवर !
लटकेन जराशानें; फांसावर—
लटकेन जराशानें !
आणि न कधिंहि कळेल कोणा
मेला 'हाय !' कशानें ?

# प्रीतिची तूं माझी मंगला .... ....

रणांगणावर घायाळ झालेल्या एका मराठ्याच्या आयुष्यांतील हा अखेरचा प्रसंग ! हातांतील टॉमी गन् हीच त्याची मंगला.

हा जीव तुला वाहिला
प्रीतिची तूं माझी मंगला ! ॥ धृ० ॥

जिवाची जोडीदारीण
समरांत खेळ मौजेन
तिळभरी न तुला बंधन
मी तर खडा तुझ्या सेवेला
प्रीतिची तूं माझी मंगला ! ॥ १ ॥

चालूंदे संगिनिची खणखण
वरि विमानाची भुणभुण
रणगाड्यांचें नर्तन—
मी तर खडा तुझ्या सेवेला
प्रीतिची तूं माझी मंगला ! ॥ २ ॥

थकलीस तूं अन् मीही संपलों
तुझ्या जिवावरी अजुनी लढलों
तवसान्निधिं रक्तांत झोंपलों
खेळ चालूंदे तुझा साजणी
जीव तुला वाहिला,
प्रीतिची तूं माझी मंगला ! ॥ ३ ॥

—**काळोख** ! जिथं-तिथं काळोख ! आणि त्या काळोखांत तरंगणारे ते खूप काजवे ! आपल्या प्रकाशाची त्यांना खूप मिजास ! खूप गर्व ! पण…पण…तो पहा नवा प्रकाश ! काळोखाचे ते थर फोडून झिरपणारा ! तो पहा तेजस्वी प्रकाश ! कुणाचं तेज तें ? कुणाचा प्रकाश तो ? अरे हें तर आमचं गुंफराज प्रकाशन ! साहित्याच्या क्षितिजावर नुकतंच उगवलेलं हें गुंफराज प्रकाशन ! अगदींच अल्प किंमतींत रसिकांच्या ज्ञानांत भर घालणारें व भरपूर करमणूक करणारें महाराष्ट्राचें हें एकमेव प्रकाशन ! दरमहा उत्कृष्ट वाङ्मयाची बरसात करणारें ! विद्यार्थ्यांस व शिक्षकांस सवलती ! वार्षिक वर्गणी फक्त रु. ३

आजच लिहा

**गुंफराज प्रकाशन**

३३६/२ भाई जीवनजी लेन, ठाकुरद्वार, मुंबई

---

**'क्रांतिपराग'चे एकमेव विक्रेते—**

## ★ गुंफराज प्रकाशन ★

भाई जीवनजी लेन, ठाकुरद्वार, मुंबई.

---

# काराणे आर्ट स्टुडिओ

## मुंबई ४

---

प्रकाशक:—**रा. शि. सामंत,** अध्यक्ष, तांबोसें ग्रामसेवा संघ, मुंबई

प्रकाशन स्थळ : ३३६/२, भाई जीवनजी लेन, मुंबई नं. २

मुद्रक : **बा. द. खडपे:** मुद्रण स्थळ :

**नीलिमा प्रिंटिंग प्रेस,** ४६, खोताची वाडी, गिरगांव, मुंबई ४.